# माझें कादंबरी-लेखन

लेखक—

नरसिंह चिंतामण केळकर
वामन मल्हार जोशी
वि. स. खांडेकर
ग. त्र्यं. माडखोलकर
नारायण हरी आपटे
श्रीधर व्यंकटेश केतकर
भा. वि. वरेरकर
नारायण केशव बेहरे

संपादक

**यादव मुकुंद पाठक**
एम्. ए. एल्. एल्. बी.
व्हाइस प्रिन्सिपाल,
नॅशनल कॉलेज, नागपूर.

मुद्रक—
ल. म. पटले, रामेश्वर प्रिंटिंग प्रेस,
सिताबर्डी, नागपूर.

प्रकाशक—
दिगंबर मारुती धुमाळ,
सिताबर्डी, नागपूर.

किंमत
दीड रुपया

# प्रास्ताविक

ललित वाङ्मयांत कादंबरी हा एक अत्यंत लोकप्रिय लेखनप्रकार आहे. मराठींत नाटकाची पिछेहाट झाल्यापासून व काव्यास ओहोटी लागल्यापासून कादंबरीशी स्पर्धा करणारें दुसरें क्षेत्रच राहिलें नाही. कुठल्याही वाचनालयांत नव्या कादंबरीवर ज्या उड्या पडतात त्यावरून हें सहज लक्षांत येण्यासारखें आहे. या लोकप्रियतेमुळेच की काय कांही टीकाकारांचें लक्षही मराठी कादंबरी

वाङ्मयाकडे विशेष प्रमाणांत वेधलें गेलें, व केवळ समालोचनात्मक लेखच नव्हेत तर एक स्वतंत्र ग्रंथही मराठी कादंबरीवर लिहिला गेला. येवढेंच नव्हें तर न० चिं० केळकरांसारखे साहित्यसम्राट् वृद्धावस्थेंत कादंबरीला शरण आले. खांडेकर—माडखोलकरांसारखे मुरब्बी टीकाकार अहमहमिकेने या क्षेत्रांत शिरले. नाटककार या नात्याने अखंड कीर्ति मिळविलेले वरेरकर उतार वयांत कादंबरीलेखनाकडे वळले. आणि ज्ञानकोशकार डॉ० केतकर आपल्या विराट कामगिरीनंतर कादंबरीलेखनांतच आनंद मानूं लागले. मराठी लेखकांस थोडाबहुत पैसाही कादंबरीलेखनानेच मिळवून दिला. या सर्व कारणांनी कादंबरीकारांसंबंधी वाचकवर्गांत कुतूहल असणें स्वाभाविक आहे.

कादंबरीलेखकांच्या लेखणींतून त्यांच्या स्वतःच्या कादंबरीलेखनासंबंधी कांही वाचावयास मिळाल्यास तें वाचकवर्गास व नवोदित लेखकांस बरेंच उद्बोधक व मार्गदर्शक होईल, या भावनेने १९३५ सालीं कांही प्रथितयश मराठी कादंबरीकारांकडे एक प्रश्नावलि पाठविण्यांत आली व त्यांनी पाठविलेलीं

उत्तरें १९३५–३६ च्या "विहंगम" मासिकांतून क्रमानें प्रसिद्ध करण्यांत आलीं. मराठी कादंबरीकारांचे ते उत्तरात्मक लेख आज पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्याचा सुयोग येत आहे.

लेखकांस जे प्रश्न विचारण्यांत आले होते ते असे:—

१ कादंबरीलेखनाकडे वळण्यास आपणांस कोणतें कारण घडलें ?

२ सत्यसृष्टीच्या आधारें आपण आपल्या कादंबऱ्यांची उभारणी करतां की केवळ कल्पनेच्या साम्राज्यांत विहार करण्याकडे आपल्या मनाचा कल आहे ?

३ कथालेखनांत आपण तत्त्वास प्राधान्य देतां की कलेस ?

४ इंग्रजी वा इतर प्रमुख भाषांत आपल्या कादंबऱ्यांचीं रूपांतरें झालीं तर जगाचें लक्ष अल्प प्रमाणांत तरी महाराष्ट्रसाहित्याकडे वळेल असा आपणास विश्वास वाटतो का ?

५ एखादा विख्यात पाश्चात्य कादंबरीकार आदर्श म्हणून आपण आपल्यापुढे ठेवला आहे काय ?

६ आपणाला आपली कोणती कादंबरी विशेष आवडते व ती कां ?

या योजनेंत बहुतेक कादंबरीकारांनी तत्परतेने भाग घेतला. फक्त प्रो. फडके यांनी 'आपलें नांव वगळावें' अशी विनंति केली आणि आपलें अंग काढून घेतलें. पुढें लवकरच "मी माझ्या कादंबऱ्या कशा लिहितों ?" हा त्यांचा लेख 'किर्लोस्कर' मासिकांतून प्रसिद्ध झाला व कालांतराने त्यांनी तो आपल्या 'साहित्य आणि संसार' या पुस्तकांत समाविष्ट केला.

बहुतेक प्रमुख मराठी कादंबरीकारांनी या योजनेंत भाग घेतलेला आहे याबद्दल मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानतों. हे लेख मासिकाच्या फाइलांतूनच पडून राहणें योग्य नव्हें; पुस्तकरूपाने ते प्रसिद्ध व्हावयास पाहिजेत इतक्या महत्वाचे ते आहेत, अशा

तऱ्हेच्या सूचना गेल्या सात वर्षांत अनेकांकडून आल्या. शेवटच्या गौण प्रश्नाचें उत्तर खेरीज करून या लेखांतील ताजेपणा अजूनही मुळीच कमी झालेला नाही. तेव्हा इतक्या वर्षांनी का होईना हीं महत्वाचीं प्रत्युत्तरें पुस्तकरूपाने प्रसिद्ध होत आहेत हा योगायोग मला आनंददायी कसा नसेल ?

मराठी कादंबरीवर आतापावेतों कांही प्रमुख ऐतिहासिक व टीकात्मक लेखच नव्हेत तर एक महत्त्वाचा ग्रंथही प्रसिद्ध झाला आहे. पण टीकाकारांचा ललित वाङ्मयाकडे पाहण्याचा दृष्टिकोण वेगळा, आणि खुद्द ग्रंथकारांचीच आपल्या कृतीकडे पाहण्याची पद्धत वेगळी. अंधळी माया ग्रंथकर्त्यास स्वतःच्या ग्रंथासंबंधीं कांहीं अद्वातद्वा विधानें करण्यास कदाचित् भाग पाडेल, पण ग्रंथकर्त्यांस येणाऱ्या अनेक अनुभूतिसंबंधी त्याला स्वतःला जितक्या सहजपणाने लिहितां येईल, तितकें टीकाकाराला केवळ तर्कानें साधणें शक्य नाही. या पुस्तकांतले लेख त्रुटित असले तरी त्यांना जें अनन्य साधारण महत्व आहे तें याच कारणामुळे !

ललित वाङ्मयाच्या प्रत्येक दालनांत आपण फेरफटका करून पहावा अशी बहुतेक प्रमुख मराठी लेखकांना तरी हौस दिसते. काव्य, नाटक, निबंध, कादंबरी, इत्यादि सर्व क्षेत्रांत आपण लीलया संचार करूं शकतों की नाही, हेंच जणुं प्रतिभावान् लेखक अजमावून पाहतात. नव्या प्रांतांत दिग्विजय मिळविण्याचें त्यांचे खेळ आयुष्याच्या अखेरीपर्यंत चालू असतात. तात्यासाहेबांच्या एकसष्टीच्या निमित्ताने प्रसिद्ध झालेल्या "केळकर" या ग्रंथांत 'कादंबरीकार केळकर' अशा तऱ्हेचा लेख कोणी लिहिण्याचें तरी मनांत आणलें काय! त्यावेळीं तात्यासाहेब एखादी कादंबरी लिहितील अशी कोणास कल्पनाही नसेल! सेवानिवृत्त झाल्यावर अगदीं उतार वयांत केळकर कादंबरीकार झाले. निबंध आणि कादंबरी या दोन्ही क्षेत्रांत कीर्तिसंपन्न ठरल्यानंतर प्रो० जोशी यांना नाट्यप्रांतांत 'विस्तवाशी खेळ' करावासा वाटलाच की नाही? कवि, टीकाकार, लघुकथा लेखक, कादंबरीकार इत्यादि नाना भूमिका रंगविण्याचा प्रयत्न

खांडेकर, माडखोलकर, आदि इतर विख्यात लेखकांनीही केला. ना. ह. आपटे यांना आपण केवळ कादंबरीकार या नात्यानेच ओळखतों, पण त्यांनी दिलेल्या माहितीवरून तेही ‘बहुप्रकृतिक’च आहेत असें म्हणावयास हरकत नाही. कादंबरी-लेखनापूर्वी कवि, नाटककार, लघुकथाकार या नात्यांनी त्यांनी प्रयोग करून पाहिले होतेच.

मराठी लेखकांच्या या बहुप्रकृतिक वृत्तींतच कादंबरीच्या क्षेत्रांत त्यांना पदक्षेप कां करावासा वाटला ह्या प्रश्नाचें उत्तर सांठवलेलें आहे असें आतां म्हणावयास हरकत नाही. केळकरांनी तर ‘सर्व प्रकारचें वाङ्मय लिहिण्याची हौस’ ह्या शब्दांत हें कबूलच केलें आहे. खांडेकरांनी प्रकाशकाचे प्रोत्साहन हें एक नैमित्तिक कारण देऊन लघुकथे-च्या क्षेत्रांत अनेक प्रसंग व संपूर्ण स्वभावचित्रें बसूं शकत नाहींत म्हणून ते कादंबरीकडे वळले असें म्हटलें आहे. वरेरकरांनाही नाटककाराचा कादं-बरीकार बनवावयास निमित्तमात्र प्रकाशकच कारणी-भूत झाला, पण कादंबरी नाटकास वावडी असल्या-

कारणाने नाट्यकलेने त्याना यशोमाला घालीपर्यंत कादंबरीला हात लावायचा नाही, असा त्यांनी आगाऊच निश्चय केला व तो तब्बल दीड तप पाळला! टीकाकाराची भूमिका व कादंबरीकाराची भूमिका यांत माडखोलकरांना सूक्ष्म साम्य आढळलें म्हणूनच ते कादंबरीक्षेत्राकडे वळले. प्रो. जोशी व डॉ. केतकर या तत्त्वजिज्ञासु गंभीरप्रकृति विद्वानांच्या बाबतींत दोन विवेचक इंग्रजी ग्रंथ कारणीभूत झाले. ना. ह. आपटे व बेहरे हे अकारणपणेंच कादंबरीकडे खेचले गेले.

ललित वाङ्मयांत व विशेषतः कादंबरीच्या क्षेत्रांत सत्यसृष्टीचा आधार आणि कल्पना यांचें प्रमाण किती असावे हा प्रश्न अत्यंत महत्वाचा असतो. पाहिलें तें लिहिलें असा प्रकार केल्याने लेखकांस फार तर वास्तववादी म्हणतां येईल पण यशस्वी कादंबरीकार होतां येणार नाही. प्रतिभावान ललितलेखक सत्यसृष्टींतील आलेल्या अनुभूतिवर विसंबूनच कल्पनानिर्मित पात्रें निर्माण करतो आणि तींच अक्षर वाङ्मयांत अमर होतात. वाचकांना

आपल्या आवतींभोंवतींच्या कांहीं व्यक्तीच ललित-लेखकांनी जाणूनबुजून वर्णिल्या आहेत असा आभास होतो. हाच आपला अनुभव प्रो. फडक्यांनी इतरत्र व प्रो. जोशी यांनी प्रस्तुत ग्रंथांतील आपल्या निवेदनांत ग्रथित केला आहे. इतर कथाकारांनीही सत्य आणि कल्पना या दोन्हीही वस्तूंच्या मिश्रणा-वरच कादंबरीचें यश अवलंबून असतें असें मानलें आहे. केवळ वरेरकरांना मात्र कादंबरीलेखनांशी कल्पनेचा कांही एक संबंध नाहीं असें वाटतें. कादंबऱ्या म्हणजे त्यांना त्यांच्या काळांतील इति-हासाच्या बखरी वाटतात ! या प्रश्नाच्या बाबतींत डॉ. केतकरांनी मूक वृत्ति स्वीकारलेली असली तरी त्यांच्या कादंबऱ्यांना कदाचित् हें वर्णन अधिक समर्पकपणें लागूं पडेल.

कथालेखनांत तत्त्वास प्राधान्य असतें की कलेस या प्रश्नावर महाराष्ट्रांत माजलेलीं रणें विख्यातच आहेत. या पुस्तकांतील प्रत्येक ग्रंथकाराने सुवर्णमध्य गांठण्याचा प्रयत्न केला आहे. 'कलेसाठीं कला' या आपल्या आवडत्या ब्रीदवाक्यासंबंधी स्पष्टीकरण

करतांना प्रो. फडके म्हणतात, “ मी जो सिद्धांत प्रतिपादतो त्यांतून कोणीही असा अर्थ काढूं नये की लोकजागृति करणें ललित लेखकाने वर्ज्य मानलें पाहिजे अशा अर्थाचें विधान मी कोठेही केलेलें नाही. ललित लेखकाने लोकजागृति केलीच पाहिजे हा एक हटवाद, तसाच त्याने ती करतां कामा नये हा देखील दुराग्रहच होईल इतकें मला खचित कळतें. कोणत्याही कृतीला एक प्रधान हेतु व एक किंवा अनेक गौण हेतु असतात. सारें भांडण आहे तें लोकजागृति हा ललित लेखनाचा आद्य व प्रधान हेतु आहे की काय याबद्दल आहे. या प्रश्नांवर माझें उत्तर असें की लोकजागृति हा ललित लेखनाचा प्रधान हेतु असूं शकत नाही. प्रधान हेतु सोडून ललित लेखनाचे गौण हेतु कोणते असूं शकतील त्याची यादी कोणी करूं लागले तर त्या यादींत लोकजागृति म्हणून एक कलम घालावयास कोणा-चीही हरकत असण्याचें कारण नाही.” तसेंच प्रो. जोशी या ग्रंथांतील आपल्या लेखांत म्हणतात, “जिच्या पोटीं कांही एक नाही अशी वाङ्मयात्मक—

केवळ कलानिरपेक्ष कला—शून्यस्वरूप होईल असें मला वाटतें. Form without content याला वाङ्मयांत तरी विशेष महत्व नाहीं. वाचेचा व अर्थाचा साध्या भाषणांत सुद्धा नित्य संबंध आहे, मग जींत कांही सौंदर्य आहे व जिला कांही मूल्य आहे अशा वाङ्मयात्मक कलाकृतींत 'अर्था' शिवाय केवळ वाचेकडे लक्ष्य देऊन कसें चालेल? हा 'अर्थ' म्हणजे तात्पर्य, उपदेश, बोध, तत्त्वज्ञान असें मुळींच नव्हे, 'अर्थ' म्हणजे तें कीं जें आपणांस लोकांना कोणत्या तरी कारणास्तव सांगावेसें वाटतें; इतकेंच नव्हे तर सुंदर रीतीनें सांगून त्यांना आनंदित करावेसे वाटतें. हें एखादें सृष्टींतील दृश्य असेल, संसारांतील दृश्य असेल, एखादी भावना असेल, एखादा प्रसंग असेल, एखादा विचार असेल व कांही प्रसंगीं एखादें तत्त्वहि असूं शकेल." यावरून आणि या ग्रंथांतील इतर कादंबरीकारांनी दिलेल्या आपल्या स्पष्ट मतांनी या वादांतील वैय्यर्थ्य वाचकांच्या लक्षांत येईल.

कादंबरी वाङ्मयाचें प्रचलित तंत्र हें इंग्रजी वाङ्मयाचें मराठीस देणें आहे. म्हणूनच आपल्या

पुढे एकादा विख्यात पाश्चात्य कादंबरीकार आदर्श म्हणून आपण ठेविला आहे काय असा प्रश्न विचारण्यांत आला होता. मराठी कादंबरीकार कोणत्याही इंग्रजी कादंबरीकाराची उसनवारी करीत नाहीत हें या उत्तरांतून स्पष्ट दिसतें. एवढेच नव्हें तर डॉ. केतकर कादंबरीचें तंत्रही आपणास बंधनकारक मानत नाहीत व म्हणतात " कादंबऱ्यांचें लक्षण कधीच बांधतां येणार नाही. आणि जें लक्षण तयार होईल त्याचा उपयोग जुन्याच्या स्पष्टीकरणापुरताच आहे. नवीन तऱ्हेच्या प्रयत्नास नियंत्रक नाही असें समजावे " मराठी लेखकाची ही मौलिकता अभिनंदनीय नाही असें कोण म्हणेल.

आणि म्हणूनच मराठी कादंबऱ्याचीं इंग्रजी व इतर प्रमुख भाषांतून रूपांतरें झालीं तर अल्पप्रमाणांत जगाचें लक्ष वेधलें जाईल की नाही असा प्रश्न लेखकांना विचारला गेला. प्रो. बेहऱ्यांनी स्वतःच्या कृतीसंबंधानें कांहीच न म्हणतां मराठींतील प्रमुख कादंबरीवाङ्मय आंतरराष्ट्रीय दृष्टीने महत्वपूर्ण नाही असें विधान केलें आहे. आपल्या देशाचें

पारतंत्र्य आपल्या वाङ्मयास जागतिक दृष्ट्या पुढे येऊं देत नाही असें ना. ह. आपटे यांचें मत आहे. प्रो. जोशी, खांडेकर आणि माडखोलकर यांच्या कादंबऱ्यांचीं इतर भाषांत झालेलीं रूपांतरें माननीय ठरलीं आहेत. तेव्हा मराठी कादंबरीकारांनी, स्वतः-च्या कलाकृति आंतरराष्ट्रीय दृष्ट्या महत्वाच्या ठरावयास हरकत नाही, असा प्रगट केलेला आत्म-विश्वास आत्मप्रौढीचा द्योतक मानण्याचें कारण नाही. महाराष्ट्रियांच्या स्वयंकेंद्रित आत्मपरतेमुळे वा दारिद्र्यामुळे त्यांच्या ग्रंथांचीं पाश्चात्य वाङ्मयांत भाषांतरें झालेलीं नाहींत म्हणून आपल्या वाङ्मयांतच कांही अर्थ नाही असें होत नाही.

महायुद्धानंतरच्या पुनर्घटनेंत मराठी ललितवाङ्मय जगांतील जनतेपुढे मानापानाने येईल असा विश्वास वाटतो.

ता. २१-१-४३
कॉंग्रेसनगर
नागपूर

यादव मुकुंद पाठक.

# माझें कादंबरीलेखन

लेखक

नरसिंह चिंतामण केळकर

कादंबरीलेखनाकडे वळण्याचें कारण म्हणजे सर्व प्रकारचें वाङ्मय लिहिण्याची हौस. प्रत्येक प्रकारांत एकेक विशेष सोय व आनंद असतो. तसाच कादंबरी–प्रकारांतही.

मी कल्पनेनें कथानकाची रचना करितों. पण त्यांतील भरती प्रायः सत्यसृष्टींत पाहिल्याऐकल्या गोष्टींचीच असते. 'नरसिंह' हा अवतारदर्शक प्राणी सत्य–सृष्टींत नाहीं. पण तो नर—मनुष्य व सिंह यांचाच जोडा आहे व हे दोनही सत्यसृष्टींतलेच होत.

इंग्रजी वा इतर प्रमुख भाषांत आपल्या कादं-बऱ्यांचीं रूपांतरें झालीं तर जगाचें लक्ष अल

प्रमाणांत तरी महाराष्ट्रसाहित्याकडे वळेल असा मला विश्वास वाटतो.

कथालेखनांत कथानक हें पहिलें. त्यांत बोध, तत्व, कलाविलास आणतां येतात.

कोणताही पाश्चात्य कादंबरीकार आदर्श म्हणून मी आपल्यापुढें मुळींच ठेवला नाहीं.

मीं एकच कादंबरी* आजवर लिहिली. बापाला आपलें मूल आवडतेंच असतें. आणि एकच मूल असल्यावर ‘ विशेष ’ आवडतें हें म्हणण्यास जागाच नाहीं.

---

*इ. स. १९३६ पर्यंत तात्यासाहेब केळकरांनी जेवढें लिखाण केलें त्यांत “ नवलपूरचा संस्थानिक ” नांवाची एकच कादंबरी होती. त्यानंतर “ कावळा आणि ढापि ” नांवाची दुसरी व “दिवाण झिप्री” नांवाची तिसरी कादंबरी त्यांनी आतां लिहिली आहे.

# माझें कादंबरीलेखन

लेखक

प्रो. वामन मल्हार जोशी. एम. ए.,

कादंबरीलेखनाकडे वळण्यास मला जें कोणतें कारण घडलें तें असें.

शाळेंत व कॉलेजांत असतांना कादंबऱ्या वाचल्या त्यांवरून आपण एखादी कादंबरी रचावी अशी अस्पष्ट व अमूर्त इच्छा होतीच. प्रिन्सिपाल गोळे यांचें '**हिन्दुधर्म व सुधारणा**' हें पुस्तक व सर आर्थर हेल्प्स यांचें 'Friends in Council' हें पुस्तक वाचल्यावर त्यांसारखें पुस्तक रचण्याच्या इच्छेस अधिक स्पष्ट व मूर्त रूप येऊं लागलें व तें

पुस्तक लिहिण्यास आरंभ केल्यावर ‘काव्यशास्त्र-विनोदा’त्मक असें मूळ रूप बदलत जाऊन कादंबरीचें स्वरूप त्याला अधिक येऊं लागलें व जगापुढें तें पुस्तक आलें तेव्हां ‘रागिणी’ हें कादंबरीस्वरूपाचें नांव मुख्य ठरून ‘काव्यशास्त्रविनोद’ हें मूळ योजिलेलें नांव दुय्यम ठरलें.

माझ्या कादंबऱ्यांची उभारणी करतांना सत्य-सृष्टीचा मी विचार करतों व कांहीं विचार, कल्पना व भावना लोकांना सांगण्याची इच्छा उत्पन्न होते. या विचारांना, या कल्पनांना व भावनांना मूर्त स्वरूप देतांना कल्पनेच्या साम्राज्यांचा अवलंब मी करतों; सत्यसृष्टींतल्या व्यक्ती माझ्या डोळ्यांसमोर नसतात. गोष्टी व कादंबरीस्वरूपाच्या माझ्या सबंध लिखाणांत एक दोन व्यक्तीच माझ्या डोळ्यांपुढें प्रत्यक्ष सृष्टीं-तल्या असतील, बाकीच्या कल्पनानिर्मित आहेत. आणि ज्या सत्यसृष्टींतल्या होत्या त्यांतहि मी इतका बदल केलेला आहे कीं, त्यांतील एकच व्यक्ति कांहीं

थोड्यांच्या ध्यानांत येऊं शकेल. व्यक्ति कल्पना-निर्मित असल्या तरी त्यांतील कांही इतक्या खऱ्या वाटतात ( कांहींना तरी वाटतात ) कीं कित्येक वेळां अमुक व्यक्तीवरून हें चित्र रंगवलें कां असें मला विचारण्यांत येते. पण त्या व्यक्ति मी पाहिलेल्या देखील नसतात.

इंग्रजी वा इतर प्रमुख भाषांत आपल्या कादं-बऱ्यांची रूपांतरें झालीं तर जगाचें लक्ष अल्प प्रमाणांत तरी महाराष्ट्रसाहित्याकडे वळेल असा मला विश्वास वाटतो.

रागिणी व आश्रमहरिणी यांचीं भाषान्तरें हिन्दींत झालीं आहेत. इंग्रजींत झालीं तर तीं कितपत आवडतील हें सांगणें कठीण. 'इन्दु काळे व सरला भोळे' याचें भाषान्तर झाल्यास कदाचित् तें आवडूं शकेल. 'आश्रमहरिणी'चें भाषान्तर करणें कठीण, कारण त्यांतील वातावरण त्यांतील शब्दांवर कांहीं

अंशीं अवलंबून आहे. पण भाषान्तर उत्तम झाल्यास तें आवडूं शकेल अशी आशा आहे.

कथालेखनांत कलावन्ताला कांहींतरी सांगावयाचें असतें. तें कांहीं सांगावयाचें नाहीं, आणि वाङ्मयात्मक कलाकृति करावयाची हें म्हणणें मला अर्थहीन वाटतें. जें सांगावयाचें असते तें ईसापच्या तात्पर्याच्या स्वरूपाचें किंवा 'मातृदेवो भव, पितृदेवो भव' अशा प्रकारच्या उपदेशाच्या स्वरूपाचें, किंवा 'स्वदेशी चळवळींत सामील व्हा' अशा प्रकारच्या लोकप्रचारात्मक स्वरूपाचें, असलें पाहिजे असें नाहीं. जें सांगावयाचें असतें त्याला 'तत्त्व' म्हणावयाचें असल्यास मीं तत्त्वाकडे पाहतों. पण 'तत्त्व' शब्द योग्य नाहीं असें मला वाटतें. जिच्या पोटीं कांहीं एक नाहीं अशी वाङ्मयात्मक—केवळ **कलानिरपेक्ष कला—शून्यस्वरूप होईल** असें मला वाटतें. Form without content याला वाङ्मयांत तरी विशेष महत्व नाहीं. वाचेचा व अर्थाचा साध्या भाषणांत

सुद्धां नित्य संबंध आहे, मग जींत कांहीं सौंदर्य आहे व जिला कांहीं मूल्य आहे अशा वाङ्मयात्मक कलाकृतींत 'अर्था' शिवाय केवळ वाचेकडे लक्ष्य देऊन कसें चालेल? हा 'अर्थ' म्हणजे तात्पर्य, उपदेश, बोध, तत्त्वज्ञान असें मुळींच नव्हे, 'अर्थ' म्हणजे तें कीं जें आपणांस लोकांना कोणत्या तरी कारणास्तव सांगावेसें वाटतें; इतकेंच नव्हे तर सुंदर रीतीनें सांगून त्यांना आनंदित करावेसे वाटतें. हें एखादें सृष्टींतील दृश्य असेल. संसारांतील दृश्य असेल, एखादी भावना असेल, एखादा प्रसंग असेल, एखादा विचार असेल व कांहीं प्रसंगीं एखादें तत्त्वहि असूं शकेल.

कोणताही पाश्चात्य कादंबरीकार आदर्श म्हणून मी आपल्यापुढें ठेवला नाहीं. मी कादंबऱ्या फार वाचलेल्या नाहींत. मीं ज्या वाचल्या त्या बहुतेक मला आवडल्या. आदर्श म्हणून कोणतीहि कादंबरी डोळ्यापुढें नसते. (पहिल्या कादंबरीच्या वेळेस

Friends in Council हें डोळ्यांपुढें होतें, पण ही कादंबरी म्हणतां येत नाहीं. )

निरनिराळ्या कारणास्तव माझ्या निरनिराळ्या कादंबऱ्या मला आवडतात. आतांपर्यंत अप्रत्यक्षपणें स्वतःच्या कृतीबद्दल कौतुकपूर्वक लिहून जें थोडेंसें अनौचित्य केलें आहे, तें संपादकजिज्ञासामूलक आहे म्हणून क्षम्य समजलें जाईल. पण प्रत्यक्ष गुणवर्णन करूं लागलों तर कांहींहि समर्थन केलें तर तें असमर्थनीयच ठरण्याचा संभव आहे, म्हणून त्या भानगडींन पडत नाहीं. दुसरें व खरें कारण असें कीं, हें काम कठीणच आहे. तें योग्य रीतीनें करावयाचें म्हणजे गुणांबरोबरच दोषांचाहि ऊहापोह केला पाहिजे व असें करावयाचें म्हणजे हें कालावधीचें काम आहे. आणि खरोखर तें दुसऱ्यानेंच केलेलें बरें. माझ्या कादंबऱ्यांपैकीं कोणती अधिक चांगली व कां यांचें उत्तर देण्याचें काम मी करण्यापेक्षां माझी वाङ्मयात्मक उत्तरक्रिया करतांना दुसऱ्यांनीं तें केलेलें बरें.

---

# माझें कादंबरीलेखन

लेखक

वि. स. खांडेकर

ऐतिहासिक दृष्टीनें कादंबरी ही लघुकथेची आई आहे. पण माझ्या बाबतींत लघुकथा ही कादंबरीची आई ठरली. प्रकाशकांच्या प्रोत्साहनाबरोबरच कादंबरी–लेखनाकडे वळण्याला आणखी एक कारण झालें. लघुकथा लिहितांना नेहमीं असा अनुभव येई कीं कांहीं प्रसंग आणि कांहीं स्वभावचित्रें लघुकथेच्या क्षेत्रांत बसूंच शकत नाहींत. नाटकांतलें पद आणि गाण्याच्या बैठकींतली चीज एकाच तऱ्हेनें आळवणें शक्य नसतें. तशांतलाच हा प्रकार. शिवाय क्षणचित्रें (Snap-shots) काढून कधीं चित्रकाराचें समाधान

होतें कां? तैलचित्रें काढण्याची आपली इच्छा त्याला कधीं ना कधीं तृप्त करून घ्यावीच लागते.

सत्याच्या पायावर उभारलेली कल्पनेची इमारत असेंच सामान्यतः ललित वाङ्मयाचें वर्णन करतां येईल. सत्यसृष्टींतील जशाच्या तशा गोष्टी माझ्या कादंबऱ्यांत मुळींच आल्या नाहीत असें नाहीं. पण सत्यावर कलेचे संपूर्ण संस्कार करून मगच त्याचा कथेंत उपयोग करणें अधिक इष्ट असें मला वाटतें. मात्र सामाजिक कादंबरीकाराला ' केवळ कल्पनेच्या साम्राज्यांत विहार करून ' चालणार नाहीं.

कथालेखनांत तत्त्व व कला यांचा संगम कित्येकांना अर्धनारीनटेश्वरासारखा विचित्र वाटतो. माझें मत तसें नाहीं. लेखकाची कलासक्ति व तत्त्वप्रतिपादनशक्ति यांचा सुंदर मेळ पडणें अशक्य नाहीं. तत्त्व हा प्राण व कला हें शरीर मानण्यापर्यंत माझी मजल जाईल. पण शरीरविरहित स्थितींत या

प्राणाचें अस्तित्व कथावाङ्मयांत शक्य नाहीं असें मला वाटतें.

कोणताही पाश्चात्य कादंबरीकार आदर्श म्हणून मी आपल्यापुढें ठेवला नाहीं.

आदर्श पुढें ठेवायला आपलें रूप आधीं चांगलें असावें लागतें. विशिष्ट आदर्श मीं आपल्यापुढें ठेवलेला नसला तरी पाश्चात्य कादंबरीकारांत टर्जिनिव्ह मला विशेष आवडतो.

इंग्रजींत व इतर प्रमुख भाषांत आपल्या कादंबऱ्यांचीं रूपांतरें झालीं तर जगाचें लक्ष अल्प प्रमाणांत तरी महाराष्ट्रसाहित्याकडे वळेल असा मला विश्वास वाटतो.

मराठींतल्या सुमारें २५–५० चांगल्या कादंबऱ्यांचीं इंग्रजींत अगर इतर प्रमुख भाषांत रूपांतरें होऊन जगाचें लक्ष अल्प प्रमाणांत महाराष्ट्र–साहित्या-

कडे वळणें शक्य असल्यास या श्रेयापैकीं एक पन्नासांश तरी भाग माझा असेल असा विश्वास प्रगट करायला कांहीं हरकत नाहीं.

आपणाला आपली कोणती कादंबरी विशेष आवडते व ती कां ? असा प्रश्न जर कोणी मला केला तर त्याचें उत्तर सध्यां तरी 'उल्काच' अधिक बरी वाटतें असें देईन. कारण ती प्रकाशनाच्या दृष्टीनें सर्वांत लहान आहे, हेंही असूं शकेल. कल्पनारम्यता, रंजकता इत्यादि दृष्टींनीं 'कांचनमृग' व 'दोन ध्रुव' पुष्कळांना आवडत असल्या तरी 'उल्के' इतकें मनोविकसनाचें वैशिष्टय त्यांत नाहीं असें मला वाटतें. अर्थातच हें मत बदलण्याचा संभव आहे.

---

# माझें कादंबरीलेखन *

लेखक

ग. त्र्यं. माडखोलकर

* हा मजकूर स्वैरविचारमध्यें मुद्रित झाला आहे.

माझी टीकाकाराची भूमिकाच मला कादंबरीकार व्हावयाला प्रेरक झाली. टीका ही कादंबरीची आई कशी होऊं शकते, याचें कदाचित् आपल्याला नवल वाटेल. मी टीकाकाराचा कादंबरीकार कसा झालों, असा प्रश्न विचारणारे अनेक लोक गेल्या दोन वर्षांत मला भेटलेले आहेत. किंबहुना, दोन वर्षांपूर्वी माझ्या 'मुक्तात्मा' कादंबरीला मिळालेल्या यशाबद्दल माझें अभिनंदन करतांना प्रो. बनहट्टी यांनीं मुंबईहून मुद्दाम पाठविलेल्या पत्रांत, त्या यशाच्या मोहाला बळी पडून, मी आपलें मूळचें विवेचकाचें क्षेत्र सोडूं

नये, असा आग्रहाचा सल्ला मला दिला होता. पण कादंबरी हा तरी एका परीनें टीकेचाच व्यापक प्रकार नव्हे काय? टीकाकार हा आपल्यापुढें येणाऱ्या ग्रंथाच्या विशेषांचें वर्णन आणि विश्लेषण करितो, तर कादंबरीकार हा आपल्यापुढें वावरणाऱ्या समाजाच्या विशेषांचें वर्णन आणि विश्लेषण करितो, एवढाच काय तो फरक. पहिल्याची भूमिका संकुचित म्हणजे फक्त वाङ्मयाच्या टीकाकाराची असते; तर दुसरा मुळीं एकंदर मानवी जीवनाचा—त्या जीवनांतील साऱ्या विशेषांचा आणि वैचित्र्याचा टीकाकार असतो. वाङ्मय म्हणजे बोलून चालून मानवी जीवनाची अनुकृति, प्रतिकृति किंवा विकृति होय. तेव्हां, त्या वाङ्मयाचे टीकाकार होण्यापेक्षां त्याला आधारभूत असलेल्या विशाल मानवी जीवनाचे टीकाकार होणें, हें अधिक उद्बोधक, अधिक आल्हाददायक नाहीं काय? मी कादंबरीलेखनाकडे वळलों, तो मुख्यतः याच भावनेनें.

ललित वाङ्मय म्हणजे निव्वळ सत्य नव्हे किंवा निव्वळ कल्पनाहि नव्हे तर अवलोकन, अनुभूति आणि आकांक्षा यांची मनोहर सरमिसळ. मनुष्य जितका कल्पक तितक्या त्याच्या आकांक्षा उत्कट आणि उच्च. शिवाय, अवलोकित किंवा अनुभूत गोष्टींचें स्मरण मनांत टिकावयाला व पुढें त्या हुबेहूब वर्णन करावयालाहि कल्पकतेची मदत अवश्य असतेच. या दृष्टीनें ललित वाङ्मयाच्या निर्मितींत कल्पकतेला अत्यंत महत्त्वाचें स्थान आहे. विशेषतः, ज्याच्या आकांक्षा उच्च असतात, त्याचें कथालेखन जात्याच कल्पकतापूर्ण असतें. ब्रिटिश मुत्सद्दी व कादंबरीकार डिझरायली यानें आपल्या कथालेखनासंबंधीं असे उद्गार काढले आहेत कीं, "माझ्या आकांक्षा जेव्हां अनावर होतात, तेव्हां त्यांना प्रकट व्हावयाला संधि देण्यासाठीं मी कादंबरी लिहावयाला बसतों; व कादंबरींत त्या इतक्या स्पष्ट आणि संघटित स्वरूपांत व्यक्त होतात कीं, त्यांना व्यवहारांत

मूर्त स्वरूप देणें मला पुढें सोपें जातें." त्याच्या 'सिबिल' या कादंबरींतील बहुतेक कल्पना पुढें तो इंग्लंडचा मुख्य प्रधान झाल्यावर त्यानें अमलांत आणून यशस्वीहि करून दाखविल्या. अशा तऱ्हेचें कर्तृत्व फारच थोड्या कादंबरीकारांत असतें, ही गोष्ट खरी. पण कोणत्याहि कादंबरीकाराच्या कृतींत जर सत्याला कल्पनेची म्हणजे अनुभूतीला आकांक्षाच जोड मिळणार नाहीं, तर तिच्यांत रम्यत्व उत्पन्न होणें अशक्य आहे. कला आणि मतप्रतिपादन या दोहोंच्या दृष्टीनें अवलोकित आणि अनुभूत घटनांत अवश्य ते फरक करून मी त्यांचा उपयोग माझ्या कादंबऱ्यांतून केला आहे. माझ्या 'भंगलेलें देऊळ' या कादंबरीविषयीं लिहितांना मुंबईच्या एका पत्रानें असें म्हटलें होतें कीं, "तें एक रमणीय स्वप्न आहे." त्या पत्राचा नेम थोडक्यांत चुकला. 'भंगलेलें देऊळ' हें स्वप्न नाहीं स्वप्नाळू प्रेमिकांची जीवनकथा आहे. त्या कादंबरींत वर्णन केलेला प्रत्येक महत्त्वाचा प्रसंग खरोखरी घडलेला आहे.

कथालेखनांत कला आणि मतप्रतिपादन या दोहोंचें महत्त्व मी सारखेंच समजतों. इतकेंच नव्हे, तर मतप्रतिपादन यशस्वी व्हावें अशी जर इच्छा असेल, तर कलेच्या बाबतींत यत्किंचितहि हयगय करून चालणार नाहीं, असें मला वाटतें. कारण ललित वाङ्मयाची मोहनी सारी त्याच्या कलात्मकतेंत, त्याच्यांतील कलाविलासांत आहे. कादंबरी हातांत घ्यावयाला जर वाचकाला उत्सुकता वाटणार नाहीं, तर तिच्यांतील मतप्रतिपादनाचा प्रयत्न निष्फळच होणार नाहीं काय ?

कोणताच पाश्चात्य कादंबरीकार माझ्यापुढें मी आदर्श असा ठेवलेला नाहीं. पण हार्डी, गॅल्सवर्दी, टर्जिनिव्ह व बॅल्झॅक हे माझे आवडते कादंबरीकार आहेत.

इंग्रजी वा इतर प्रमुख भाषांत आपल्या कादं-बऱ्यांचीं रूपांतरें झालीं तर जगाचें लक्ष अल्प

प्रमाणांत तरी महाराष्ट्रसाहित्याकडे वळेल असें मनमोकळेपणानें म्हणणें म्हणजे स्वतःवर आत्मप्रौढीचा आरोप ओढवून घेण्यासारखें आहे. आत्मविश्वास हा अहंकाराचाच धाकटा भाऊ समजला जातो; व त्याचें स्वगत भाषण आपल्याला कितीहि प्रोत्साहक होत असलें, तरी नाटकांतील पात्राच्या स्वगत भाषणाप्रमाणें तें लोकांच्या कानांवर पडूं देऊन स्वतःला हास्यास्पद करून घेण्यांत काय स्वारस्य?

मला माझी कोणतीच कादंबरी आवडत नाहीं. गेल्या उन्हाळ्यांत मुंबईस असतांना श्री. श्रीपाद अमृत डांगे हे 'मुक्तात्मा' कादंबरीविषयीं बोलतांना मला म्हणाले, "आमच्या आरंभींच्या चळवळीचें वर्णन तुम्ही अगदीं हुबेहूब व अतिशय उठावदार केले आहे." त्यांचे हे उद्गार ऐकून मला बरें वाटलें; व साम्यवादी चळवळीच्या महाराष्ट्रांतील उपक्रमाचें शब्दचित्र म्हणून माझ्या कादंबरीला जगाच्या दृष्टीनें थोडें तरी महत्त्व मिळेल, असा विचार क्षणैक

माझ्या मनांत चमकून गेला. पण, माझ्या दोन्ही कादंबऱ्यांना निरनिराळ्या कारणांमुळें लोकप्रियता लाभली असली, तरी मला स्वतःला मात्र माझें हें कथालेखन समाधानकारक वाटत नाही. मध्यप्रांतांतील जंगल सत्याग्रहाच्या चळवळीवर मी सध्यां लिहीत असलेली कादंबरी* मात्र कदाचित् मला आवडण्याचा संभव आहे. परंतु, जी कादंबरी अद्याप प्रसिद्धच काय, पण पूर्णसुद्धां झालेली नाहीं, तिच्यासंबंधीं वाच्यता करण्यांत काय अर्थ ?

---

* ह्या कादंबरीचें नांव "कान्ता" असें आहे.

# माझें कादंबरीलेखन

लेखक

नारायण हरि आपटे,

कादंबरीलेखनाकडे मी प्रथमतः कसा वळलों हें आज मला नीटसें सांगतां येणार नाहीं. कारण, बऱ्याच अल्पवयांत कसली तरी रचना मी करूं लागलों. १०।१२ वयाच्या दरम्यान कवि, १२।१३ च्या दरम्यान नाटककार, १५ व्या वर्षीं लघुकथा-लेखक आणि १७ व्या वर्षीं कादंबरीकार. माझ्या वयाच्या १९ व्या वर्षीं माझी कादंबरी '**अजिंक्य-तारा**' ही छापून लोकांपुढें आली. तात्पर्य, कादंबरीलेखन मी कां करूं लागलों, हें माझें मलाच माहित नाहीं. मला स्वतःला कादंबऱ्या तितक्याशा

आवडत नाहींत. यामुळें वाचनाच्या पहिल्या उमेदींतहि माझें कादंबरीवाचन बेताचेंच होतें. मला खरी गोडी प्राचीन इतिहासाची पण दैवगतीला माझ्या लेखणीला असें वळण द्यावयाचें होतें.

माझें कोणतेंहि लेखन अनुभवापलीकडे केवळ कल्पनारम्य नाहीं. यामुळें सत्यसृष्टीच्या आधारें मी आपल्या कादंबऱ्याची उभारणी करतों म्हणण्यास हरकत नाहीं. मात्र माझ्या लेखनाचें ( परस्पेक्टिव्ह ) यथार्थदर्शन रेखीव व शास्त्रशुद्ध नसल्यामुळें माझीं समाजचित्रें तितकीं सफाईदार नाहींत. मात्र त्यांचा आत्मा निव्वळ महाराष्ट्रीय आहे, अशी माझी समजूत आहे.

कथालेखनांत तत्त्व व कला यांचें योग्य प्रमाणांत मिश्रण असावें, अशा मताचा मी आहे. यामुळें केवळ कला किंवा केवळ तत्त्व हीं दोन्हीं टोकें मला अमान्य आहेत. कला ही कथालेखकाचा आत्मा असून

तत्त्व हें हवेप्रमाणें आहे. कथालेखनाच्या जिवंतपणाला दोहोंची आवश्यकता आहे, हें न सांगतां कळण्यासारखें आहे.

कोणताही पाश्चात्य कादंबरीकार आदर्श म्हणून मी आपल्यापुढें ठेवला नाहीं.

पाश्चिमात्य कादंबरीकार आमच्यापेक्षां बुद्धीनें श्रेष्ठ नाहींत व त्यापैकीं एकादा आदर्श असेल असें मला मुळींच वाटत नाहीं. या समाजामध्यें अहंकारापेक्षां दुखवलेला राष्ट्रीय अभिमान जास्त आहे.

गुलामांच्या भाषेला किंवा साहित्याला स्वातंत्र्याभिमानी कुत्रासुद्धां विचारणार नाहीं, विचारीत नाहीं. आहे या स्थितींत मराठीनें जागतिक वाङ्मयांत स्थान मिळविण्याची आकांक्षा धरणें म्हणजे केवळ मनांतले मांडे आहेत. श्रीमंताच्या घरांतील प्रमुख माणसें आनंदानें एकत्र येऊन काव्यशास्त्रविनोद करण्यास बसलीं तर तेथें घरच्या आचारीपाणक्यास

कोण बोलावील किंवा त्याच्या मनोरंजक बोलण्याकडे कोण लक्ष देईल ? उलट त्यानें तसा कांहीं चोंबडे-पणा केला तर त्यास धक्के मात्र मिळतील ! तसा जगांतील स्वतंत्र देशाचे लेखक व हिंदुस्थानांतील लेखक यांचा संबंध आहे. हिंदुस्थान स्वतंत्र असता तर माझ्या लेखनाला जागतिक वाङ्मयामध्यें एव्हांच स्थान मिळून गेलें असतें. इतकेंच नव्हे, अगदीं फुटक्या तुटक्या लेखकांचीसुद्धां वरणी लागली असती.

मला माझ्या साऱ्या कादंबऱ्या उत्कृष्ट वाटतात. अपत्यवत्सल पित्याला प्रत्येक मुलांतील प्रत्येक गुण आवडत असतो. बरें त्याला आपल्या मुलासंबंधीं सत्य अभिप्राय विचारला तर तो म्हणेल—आहेत इतर चार मुलांप्रमाणें. माझ्या पुस्तकाबद्दल माझाहि अभिप्राय असाच आहे. माझ्या आवडीप्रमाणें विचा-राल तर मी म्हणेन सर्वच चांगलीं आहेत. जगाच्या दृष्टीनें विचाराल तर रुचिभिन्नत्त्वावर कस लागेल तो.

---

# माझें कादंबरीलेखन

लेखक

डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर, एम. ए., पीएच. डी.

मला माझ्या कादंबरीलेखनाविषयीं विशेष सांगतां येण्याजोगें नाहीं. कोणताहि संकल्प करून कादंबरी-लेखनाकडे प्रवृत्ति झाली नाहीं. पाश्चात्य कादंबऱ्या फारच थोड्या वाचल्या आहेत. एकोणिसाव्या व विसाव्या शतकांतील इंग्रजी कादंबरीकारांचीं नांवें मात्र माहीत आहेत. त्याच्या ग्रंथांचें वाचन मुळींच झालें नाहीं असें म्हटल्यास चालेल. १९०२ सालीं इंटरमिजिएटच्या वर्गामध्यें होतों, तेव्हां "लॅंबन्स एसेज" नांवाचा एक निबंधसंग्रह अभ्यासाला नेमला होता. त्यांत इंग्रजी निबंधावरून कादंबरी कशी

अवतरली, हें वाचलें होतें. आणि त्यामुळें निबंध आणि कादंबरी या दोहोंचें मिश्रण माझ्या हातून कांहीं अलक्षितपणें तयार झालें असावें, असें माझ्याविषयीं विचार केला असतां वाटतें. डुमास आणि झोला या फ्रेंच ग्रंथकारांच्या कांहीं कादंबऱ्या वाचल्या. त्याप्रमाणें रशियन ग्रंथकार इव्हान, टुरगिनिव्ह यांच्याहि वाचल्या. रडियार्ड किपलिंगच्या कांहीं गोष्टी वाचल्या. मराठी कादंबऱ्या देखील फारच थोड्या वाचल्या आहेत. जेव्हां कथानक कांहीं सामाजिक चित्र देत असेल तेव्हां ती कादंबरी वाचावी असें वाटे. अमेरिकेंत असतां मासिकांतील कथा कधीं कधीं वाचीत असे. तथापि जेव्हां समाजांतील निरनिराळ्या अनुभवाच्या व्यक्ति आत्मचरित्र किंवा आपले अनुभव लिहीत असत, तेव्हां त्याचें लिखाण अधिक आतुरतेनें वाचीत असे. माझ्या लिखाणाला कादंबरी म्हणावें किंवा म्हणूं नये असा प्रश्न उत्पन्न करतात, त्यांना उत्तर असें आहे कीं, माझ्या काद-

ऱ्या ह्या कादंबरी या व्याख्येंत बसत नसतील तर कादंबरी या शब्दाची व्याख्या बदलावी किंवा त्या कृतींचें वर्गीकरण निराळेंच नांव देऊन करावें. कादंबऱ्याचें लक्षण कधींच बांधतां येणार नाहीं. आणि जें लक्षण तयार होईल त्याचा उपयोग जुन्याच्या स्पष्टीकरणापुरताच आहे. नवीन तऱ्हेच्या प्रयत्नास नियंत्रक नाहीं असें समजावें. जेथें पाश्चात्य किंवा देशी कादंबरीकारांच्या कादंबऱ्यांचें वाचनच इतकें संपुष्टांतलें आहे, तेथें कोणाच्या लेखाचा मनावर परिणाम झाला हें सांगणें दुरापास्त आहे. मनोरंजनार्थ वाचन झालेंच नाही असें मात्र नाहीं. लहान लहान ज्या अनेक कादंबऱ्या फुरसदीच्या वेळीं हातीं पडल्या आणि वाचल्या, त्यांत विविधता मात्र पुष्कळ होती. पण त्या बहुतेक अप्रसिद्ध लेखकांच्या होत्या व त्या तात्पुरती करमणूक म्हणून वाचल्या गेल्या. मिसिसिपी संस्थानांतील निग्रो, आर्मिनियांतील लोक, सैबेरियांतील कैदी, गुप्तसंघांची कारस्थानें,

रशियांतील जुलमी प्रकार, स्त्रियांच्या अनीतीची भडक वर्णनें, पाद्र्यांची अनीति, या सर्व प्रकारच्या गोष्टी सांगणाऱ्या कथा वाचल्या, पण त्या कथांच्या लेखकांचें नांवहि लक्षांत नाहीं.

---

# माझें कादंबरीलेखन

लेखक
भा. वि. वरेरकर,

कथात्मक वाङ्मय निर्माण करण्याची माझी लहानपणापासूनच महत्त्वाकांक्षा होती. पण माझ्या मनाचा ओढा प्रामुख्यानें नाटकाकडे असल्यामुळें माझ्या लेखनाची सुरुवात नाटकांनें झाली. त्यापूर्वीं लघुकथा मीं बऱ्याच लिहिल्या होत्या आणि एक लहानशी कादंबरीही लिहिली होती.

नाटकलेखनाचा अभ्यास मी जसजसा करूं लागलों तसतसें कादंबरीलेखन हें नाटकाला वावडें आहे, असें मला वाटूं लागलें. 'पाल्हाळ' कादंबरीला जसा

आवश्यक आहे तसाच तो नाटकाला वर्ज आहे. म्हणून नाटक लिहिण्याची शैली अंगीं बाणेपर्यंत कादंबरी न लिहिण्याचा–मी निश्चय केला होता. नाटकलेखनांत दीड तप गेल्यावर प्रसिद्ध कादंबरीकार ना. वि. कुळकर्णी यांच्या आग्रहावरून 'चिमणी' ही पहिली कादंबरी मी लिहिली.

कादंबरीलेखनाशीं कल्पनेच्या विहाराचा कांहीं संबंध आहे असें मला वाटत नाहीं. कल्पना ही काव्यासाठीं आहे–किंवा चित्रकलेसाठीं आहे; कादंबरी हा इतिहास आहे. राष्ट्राच्या घडामोडीच्या कादंबरीलाच तेवढी 'इतिहास' अशी आपण संज्ञा देतों. पण आजच्या परिस्थितीकडे पाहिलें तर हा इतिहास देखील बनावट दिसतो असें आपणांस दिसून येतें. औरंगजेबाच्या दरबारचे लेखक शिवाजीला लुटारू म्हणतात आणि महाराष्ट्रांतील लेखक औरंगजेबाला दुर्गुणाचा पुतळा समजतात. सत्याच्या कांटेकोर ताजव्यांत तोलल्यास या दोन्ही व्यक्ति महान

आहेत. लेखकाच्या दृष्टिकोणाच्या अनुरोधानें तो आपल्या मताप्रमाणें—राजकारणानुरोधानें तशीं चरित्रें रंगवीत असतो.

पण कादंबरीलेखनाला राजकीय स्वार्थाचा निर्बंध नसतो. कादंबरी हा समाजाचा इतिहास लिहिण्यापेक्षां, समाजाचा इतिहास कादंबरीरूपानें लिहिण्यांत वास्तवता आणि प्रामाणिकपणा पहिल्यानें पाळला पाहिजे. असा हा इतिहास लिहितांना लेखकाच्या भविष्यदृष्टीच्या अनुरोधानें आदर्शचित्रें रंगवलीं जातात. पण तीं वास्तवतेच्या उत्क्रांतीचीं आदर्शस्वरूपें असतात. अतएव अशीं ध्येयात्मक चित्रेंही वास्तवतेची हानी करीत नाहींत.

माझ्या कांहीं कादंबऱ्यांचीं परीक्षणें मीं पाहिलीं. मला असें दिसून आलें कीं टीकाकार म्हणविणारे हल्लींचे लेखक, सामाजिक परिस्थितीच्या अवलोकनांत पूर्णपणानें आंधळे असतात. प्रत्यक्ष घडलेल्या गोष्टी-

वरून लिहिलेले प्रसंग त्यांना कल्पनात्मक वाटतात. माझा ' धांवता–घोटा ' हीच कादंबरी घ्या....तिचें परीक्षण करतांना एका 'प्रथितयश' टीकाकारानें ती 'Oil' या अमेरिकन कादंबरीवरून मीं लिहिली आहे असें म्हटलें होतें. प्रत्यक्ष त्या कादंबरींतच मूलभूत कल्पना नायकाला अमेरिकन कादंबरीवरून सुचली असें जें म्हटलें आहे त्याच्यावरूनच या टीकाकारानें हा आरोप केला असावा असें वाटतें. ती अमेरिकन कादंबरी 'Oil' मात्र खास नव्हे. गिरणीवाल्याच्या अपत्यानें मजुरांचा पुढारी झाल्याचें उदाहरण आज अस्तित्वांत आहे. अहमदाबादच्या गिरण्यांच्या चळवळीचा इतिहास ज्यांना माहित आहे त्यांना 'कान्होबा' अवास्तव वाटणार नाहीं.

माझ्या कादंबऱ्या ह्या माझ्या काळांतील इतिहासाच्या बखरी आहेत. कल्पनेच्या साम्राज्यांत विहार करून वाचकांची दिशाभूल करण्याइतका अप्रामाणिकपणा माझ्या अंगीं नाहीं.

तेंच उदाहरण 'उघडझांप' या कादंबरींतील नायकेचें. गाढवा म्हणून बत्री सुरेशच्या थोबाडींत देते हा प्रसंग. कित्येक टीकाकारांना, नव्हे खांडेकरासारख्या कादंबरीकारांनाही अवास्तव वाटतो. पण हा प्रसंग प्रत्यक्ष घडलेला आहे. नुसत्या एवढ्याच प्रसंगाचा उल्लेख करून माझ्या कादंबरींतील नायिकाची निर्मिति दोषास्पद आहे असा आरोप करण्यापूर्वीं त्या विशिष्ट प्रसंगाच्या मागील पुढील अनुसंधानें पाहिलीं जात नाहींत किंवा बुद्धिपुरस्सर तीं छापविलीं जातात असेंच मला वाटतें. सत्य हें कल्पनेपेक्षांही विचित्र आहे अशी जी म्हण आहे ती अशा वेळींच सार्थ वाटतें.

इंग्रजी वा इतर प्रमुख भाषांत आपल्या कादंबऱ्यांचीं रूपांतरें झालीं तर जगाचें लक्ष अल्प प्रमाणांत तरी महाराष्ट्रसाहित्याकडे वळेल असा मला विश्वास वाटतो.

महाराष्ट्रीय साहित्याकडे जगाची नजर वळल्या-

शिवाय महाराष्ट्रीय साहित्याचा विकास होणार नाहीं. इंग्लिशेतर युरोपियन साहित्याचीं (ज्यांना Continental साहित्य म्हणतात त्या साहित्याची) भाषांतरें इंग्रजींत झालेलीं असल्यामुळें ब्रिटिश लेखकांपलीकडेही युरोपिअन लेखक आहेत, याची जाणीव जगाला होते आहे. सर्व काम शिकणें सर्वच लोकांना कांहीं शक्य नाहीं. इंग्रजी भाषेनें आज जागतिक माध्यमाचें स्थान पटकावलें आहे. अमेरिका म्हणजे अर्धें जग, त्या अर्ध्या जगानें इंग्रजी हें माध्यम पत्करल्यामुळें इंग्रजी भाषेला जागतिक स्वरूप आलें आहे. रवींद्रनाथ टागोर यांना नोबेल प्राईज मिळाल्यापासून हिंदुस्थानांतही लेखक आहेत याची जाणीव हिंदुस्थानेतर जगाला होऊं लागली आहे. पण त्याचबरोबर हिंदुस्थान म्हणजे बंगाल असा हिंदुस्थानेतर जगाचा समज होऊं लागला आहे.

रवींद्रनाथ टागोर यांचे समकालीन लेखक बंगाल्यांत त्यांना फारसा मान देत नसत. प्रख्यात वंगसाहित्यिक

सुरेशचंद्र समाजपति यांच्या ‘ साहित्य ’ मासिकाचा वाचक असलेल्या प्रत्येक व्यक्तीला हें नव्यानें सांगण्याची जरूरी नाहीं. समाजपति बाबूंच्या मृत्यूनंतर किंवा तितक्याच सुमाराला रविबाबूंना नोबेल प्राईज मिळालें. आणि तिथूनच रवींद्रनाथ टागोरांचा बोलबाला झाला. हें नोबेल प्राईज मिळालें नसतें तर शरद्चंद्र चट्टोपाध्यायसारख्या वास्तवतात्मक लेखकापुढें रवींद्रनाथाचें नांव बंगाल्यांत गाजलेंही नसतें असा माझा प्रामाणिक समज आहे.

आज इंग्रजी भाषेंतून ज्या Continental लेखकांच्या ग्रंथाचीं भाषांतरें झालीं आहेत ते सर्वच कांहीं अव्वल दर्जाचे ग्रंथकार आहेत असें नाहीं. तेव्हां आपल्या महाराष्ट्रांतील कांहीं ग्रंथांचीं इंग्रजींत भाषांतरें झालीं तर तेवढ्यासाठीं पाश्चात्य ग्रंथकारांच्या तुलनेचा प्रश्न आणण्याची जरूरी आहे असें मला वाटत नाहीं. अमेरिका किंवा इंग्लंड येथील प्रकाशक जात्याच विलक्षण बुद्धीचे असल्यामुळें नालायक

पुस्तकांचें प्रसिद्धीकरण पत्करणारच नाहींत. पण हिंदुस्थानांत 'महाराष्ट्र'या नांवाचा एक प्रान्त आहे, आणि त्या प्रान्तांतही कांहीं ग्रंथकार असूं शकतात याचा पुरावा शाबित करण्यासाठीं तरी मराठी ग्रंथांचीं इंग्रजी भाषांतरें इंग्लंडांत किंवा अमेरिकेंत प्रसिद्ध करण्याचे प्रयत्न करणें अवश्य आहे. हिंदुस्थानांतील वेगवेगळ्या भाषांत विशेषतः हिंदींत मराठी ग्रंथांचीं भाषांतरें झालीं तर तीं भारतीय वाङ्मयांत अग्रस्थान पटकावतील असें मला वाटतें.

कादंबरी म्हणजे समाजाचा इतिहास आहे. प्रबंधात्मक वाङ्मयापेक्षां कथात्मक वाङ्मयच जास्त वाचलें जातें हें प्रत्येक लायब्ररीच्या वाचकांचा आढावा पाहिला असतां आणि पुस्तकविक्रेत्यांचा हिशेब घेतला असतां दिसून येते. तत्त्वात्मक प्रचार करणें ह्मणजे ऐतिहासिक सत्याला अनुलक्षून ध्येयात्मक चरित्रें निर्माण करणें होय. अशीं चरित्रें निर्माण करण्याची जी 'शैली' तिलाच जर कला म्हणायचें असेल तर

लेखनशैलीशिवाय ग्रंथलेखनच संभवत नाहीं. कलेच्या नांवाखालीं हल्लीं ज्याप्रकारचें कथात्मक वाङ्मय निर्माण होत आहे तें लेखनभीरुतेचें प्रतीक आहे. इतर धंदे करून फुरसतीच्या काळांत वाङ्मयानिर्मिति करणारे कित्येक लेखक कलेच्या नांवाखालीं जी वाङ्मयनिर्मिति करीत आहेत, ती अशाच प्रकारची आहे. सर्व प्रकारच्या समाजांत मिसळण्याची ज्याची प्रवृत्ति नाहीं किंवा ज्याला अनुकूलता नाही त्याला सर्वसामान्य जनतेच्या सुखदुःखांचें आविष्करण केव्हांही करतां येणार नाहीं. अशी अनुकूलता नाहीं त्याला सर्वसामान्य जनतेच्या सुखदुःखांचें आविष्करण केव्हांही करतां येणार नाही. अशी अनुकूलता नसलेले लेखकच अनिश्चित, अस्पष्ट आणि अंधुक स्वरूपाचें कथात्मक वाङ्मय निर्माण करून कलेच्या नांवाखालीं महाराष्ट्राचा घात करीत आहेत. प्रवास, अवलोकन, अभ्यास आणि व्यवसाय यांच्यायोगानें निर्माण केलेलें कथात्मक वाङ्मयच प्रामाणिक वाङ्मय या संज्ञेस प्राप्त होतें.

कोणताही पाश्चात्य कादंबरीकार आदर्श म्हणून मी आपल्यापुढें ठेवला नाहीं. पण सर्व देशांतील लेखकाच्या ज्या ज्या कादंबऱ्या इंग्रजी भाषेंत उपलब्ध आहेत त्या व हिंदुस्थानांतील बंगाली, हिंदी, गुजराती आणि मराठी भाषेंतील कादंबऱ्या मीं अधाशासारख्या वाचल्या आहेत. पण त्यांचा माझ्या कादंबरीलेखनावर थोडासाही परिणाम होऊं नये याबद्दल मी खबरदारी घेत असतों. वाचनाचा उपयोग बुद्धीला व्यायाम मिळण्यापुरताच आहे. व्यक्तिपूजा उत्पन्न होण्यासाठीं नव्हे. महाराष्ट्रीय कादंबरी लिहितांना ती पूर्णपणें प्रातिनिधिक स्वरूपाची व्हावी याकडेच माझें लक्ष असतें. म्हणून पाश्चात्य लेखकाचा आदर्श पुढें ठेवण्याची जरूरी मला केव्हांच भासली नाहीं. आणि अशा प्रकारचा आदर्श ठेवण्याचा कादंबरीकारानें प्रयत्न करूं नये असें माझें मत आहे.

कॉलेजांतील शिक्षणामुळें कांहीं विशेष लेखकांबद्दल व्यक्तिपूजा उत्पन्न होते आणि अध्यापकांच्या

न्यूनगंडामुळें कॉलेजांतून बाहेर पडणाऱ्या पदवीधरांत पाश्चात्य लेखकांवर जो एक अतिमानुषी भावनेचा आरोप करण्याची प्रवृत्ति उत्पन्न होते त्यामुळेंच भारतीय वाङ्मयाचें मोठें नुकसान झालें आहे.

माझ्या सर्वच कादंबऱ्या मला आवडतात. त्यांत मुळींच भेदभाव नाहीं. प्रत्येक कादंबरी लिहितांना ती पूर्ण विचाराअंतीच लिहिली असल्यामुळें आवडी-निवडीचा प्रश्नच उद्भवत नाहीं. मात्र माझ्या ‘ धांवतां धोटा ’ या कादंबरींत परिस्थितीच्या दाबामुळें कित्येक वास्तव प्रसंग वगळावे लागले आहेत याचेंच मला दुःख होतें.

# माझें कादंबरीलेखन

लेखक

प्रो. नारायण केशव बेहेरे

मनुष्य आपल्या मनांतील विचार प्रकट करण्या-करितां भाषेचा आश्रय घेतो आणि आपल्या विचारांची जनतेवर छाप पडावी या इच्छेनेंच तो ते विचार लेखनांकित करतो. कारण, विचार शब्दांत चित्रित झाले म्हणजे ते जनतेंत प्रसार पावूं शकतात व त्यांच्या कुवतीप्रमाणें जनतेवर त्यांची छापहि पडूं शकते. मनांतले विचार मनांतच राहिले तर परिणा-माच्या दृष्टीनें ते वांझोटे ठरतील. केवळ स्वतःच्या आनंदाकरितां व करमणुकीकरितां कोणीहि लेखन करत नाहीं. तशी कोणी थापेबाजी करील तर ती

खुशाल अविश्वसनीय समजावी. मनुष्य स्वतःच्या कल्पनासाम्राज्यांत दंग राहूं शकेल व मानसिक आनंदहि लुटूं शकेल. परंतु तो तीं कल्पनाजालें कागदावर चित्रित करण्याचा खटाटोप कां करील? आपल्या कल्पनांचा जनतेंत प्रसार व्हावा, आपल्या विचारांची जनतेवर छाप पडावी, आपल्याला त्यामुळें आनंद व कीर्तिलाभ व्हावा, आपणाला अदैविक शब्दसृष्टींत अमरपद मिळावें—वगैरे प्रकारची विचारसरणी जगांतील कोणत्याही लेखकाच्या लेखनामागें अस्पष्टपणें व गुप्त रूपानें उभी राहून त्यास प्रेरणा व चैतन्य देऊन लेखनप्रवृत्त करते. सामान्य लोकांपेक्षां आपण कोणीतरी मोठे द्रष्टाचार्य आहोत, लोकांना जगाची, सृष्टीची किंवा मानवी मनाची जीं कोडी आजपर्यंत उलगडली नसतील तीं त्यांना आपण आपल्या लेखनानें सहज समजवून दाखवूं शकूं व त्यामुळें त्यांना शहाणे व आनंदित करूं अशी अहंभावना प्रत्येक लेखकाच्या मनांत लपलेली असते. त्याशिवाय लेखनाची दगदग आणि तें प्रसिद्ध

करण्याची यातायात कोणीहि करणार नाहीं. सामान्य माणसापेक्षां लेखकाचें मन अधिक भावनाशील, कल्पनाप्रचुर व बुद्धिप्रधान असतें. त्याच्या मनांत विचारांचा कल्लोळ माजला म्हणजे तो ते विचार शब्दचित्रित करतो. आपल्या सोयीप्रमाणें, आपल्या मनाच्या रचनेनुसार व विचार–विषयांच्या अनुरोधानें तो आपल्या विचारप्रगटीकरणाला कधीं काव्याचें, तर कधीं प्रबंधाचें, तर कधीं कथाकादंबरीचें, तर कधीं नाट्याचें स्वरूप देतो. आपल्या विचारांना कोणता पोषाख चढविला म्हणजे ते अधिक प्रभावशाली बनतील, सुंदर आणि आकर्षक दिसतील एवढाच तो विचार करतो आणि आपल्या हौशीनुरूप व अनुभवानुसार किंवा अंतर्मनाच्या प्रेरणेप्रमाणें तो आपल्या विचार–प्रकटीकरणाला लेखनतंत्रांचें एखादें लेणें चढवितों. मनुष्याचें अंतर्मन किंवा त्याची प्रेरणा हींदेखील त्याला पूर्वीं आलेल्या परंतु मनांत सुस्पष्ट न झालेल्या परंतु तेथें उमटलेल्या अनुभव–जंजाळाचाच अदृश्य व संदिग्ध परिणाम होय. तर्कशास्त्राच्या

नियमानुसार त्या प्रेरणेचे धागेदोरे माणसाला स्पष्टपणें उलगडून दाखवितां येत नाहींत एवढाच काय तो फरक. या सर्वसामान्य लेखकवर्गांतच मीहि मोडत असल्यामुळें माझ्या विचारप्रगटीकरणाला कधीं काव्याचें, कधीं प्रबंधाचें तर कधीं कथा–कादंबरीचें स्वरूप लाभलें आहे. शास्त्रीय भाषेंत तें कारण अंतर्मनाची प्रेरणा असें सांगतां येईल, तर सामान्य शब्दांत माझी लहर असेंहि देतां येईल.

कादंबरीची उभारणी सत्यसृष्टींत आलेल्या विविध अनुभवांवरच करण्यांत येते. परंतु हे विविध अनुभव एकाच वेळीं, एकाच स्थळीं किंवा एखाद्या विविक्षित प्रसंगीं आलेले नसतात. निरनिराळ्या वेळीं व स्थळीं घडलेल्या घटना, अनुभवलेली, पाहिलेली किंवा ऐकलेली प्रसंग–विविधता, विचारांचे व वाचनाचे संस्कार, या सर्व गोष्टींच्या पंचमेळ खिचडीवर कादंबरीकारांचा स्वयंपाक सिद्ध होतो. परंतु कादंबरीला आधार सत्य-सृष्टीचा असला तरी तिचा डोलारा कल्पनासाम्राज्यां-

तून निर्माण होतो. घराला पायव्याचें जें महत्व तेवढेंच कादंबरीला सत्यसृष्टींतील अनुभवांचे असतें. पण घराचा पायवा सहसा कोणाला दिसत नाहीं व त्याच्यांत काय भरलें आहे हें उमगत नाहीं. दर्शनी इमारत मात्र सर्वांचें लक्ष वेधतें. कादंबरीची ही भव्य व दृश्य इमारत कल्पनेच्या चुन्यानें बांधलेली असते. तो चुना नीट साधला नाहीं तर इमारत कच्ची राहील व कधीं ढासळेल याचा नियम राहाणार नाहीं. शिवाय त्या इमारतीचे सौंदर्य लेखकाच्या कुशलतेवर अवलंबून असते. ज्ञान व अनुभव हा इमारतीचा मालमसाला, आणि त्याला कल्पनेची जुडाई व कौशल्याची घडाई केली म्हणजे कादंबरीचा डोलारा तयार होतो. सत्यसृष्टीचा आधार व कल्पना —साम्राज्याचा विस्तार एकत्र झाल्याशिवाय कादंबरी निर्माणच होऊं शकत नाही. कल्पनेचें राज्य नसलें तर ऐतिहासिक कादंबरीला इतिहासाचें व सामाजिक कादंबरीला चरित्राचें स्वरूप प्राप्त होईल. कादंबरींत सत्य व असत्य यांचें योग्य प्रमाणांत मिश्रण असतें.

सामाजिक व ऐतिहासिक कादंबरींत फक्त काळाचाच काय तो फरक असतो. सामाजिक कादंबरी वर्तमान काळाचे तर ऐतिहासिक कादंबरी भूतकाळाचें चित्रण प्राधान्येंकरून करतें. परंतु दोन्ही प्रकारच्या कादंबऱ्यांना भविष्यकाळाच्या कल्पनेचा व लेखकाच्या ध्येयप्रधान चष्म्याचा वा दृष्टीचा रंग भरावाच लागतो. त्याशिवाय त्यांना कादंबरीचें स्वरूप प्राप्त होणार नाहीं. त्यामुळें आजची एखादी सामाजिक कादंबरी शंभर वर्षें यदाकदाचित् जगली तर तेव्हां ऐतिहासिक कादंबरीचें स्वरूप तिला अनायासेंच प्राप्त होईल. ऐतिहासिक कादंबरी लिहिणाऱ्या लेखकाला मर्यादित कल्पनासाम्राज्यांत विहरावे लागते. कारण अफझुलखानानें शिवाजीचा वध केला किंवा दोघांचे इंग्रजी भाषेंत संभाषण झालें असें त्याला रंगावतां येणार नाहीं. सामाजिक कादंबरीकाराला मात्र कल्पनेचें विशाल साम्राज्य स्वेच्छेनुसार उपभोगतां येतें.

तत्त्वाशिवाय कोणतेंहि लेखन होऊं शकत नाहीं. तत्त्व हा लेखनाचा आत्मा, कथानकांतील आनंद हा कादंबरीचा देह व कला हा तिचा पोषाख होय. ध्येय, अनुभवसिद्ध विचार व आनंद-प्रेममय शृंगार यांच्या मिश्रणावांचून कादंबरी निर्माण होणें शक्य नाहीं. कादंबरीलेखनांत शृंगाराला महत्व आहे हें खरें. कारण कथानक मनोरंजक व आकर्षक होण्यावरच तिची खरी भिस्त असते. परंतु मुलांना द्याव-याच्या क्विनाइच्या गोळीभोंवती साखरेचा गोड थर भरभक्कम जाड असला तरी तिच्या आंत औषध लपलेलें असतेंच. तें दिसत नाहीं एवढेंच. परंतु मुलांनीं ती गोळी वरवर चघळून गिळली नाहीं आणि तिचा शेवटपर्यंत स्वाद घेण्याचा निश्चय केला तर त्या गोळीचें खरें स्वरूप त्यांच्या लक्षांत आल्यावांचून कदापि राहणार नाहीं. त्याप्रमाणेंच कलापूर्ण नटलेल्या कोणत्याहि कादंबरींत तिचा ध्येयप्रधान आत्मा गुरफटून लपलेला असतो.

त्याची ओळख वाचकाला सहजगत्या पटते आणि यांतच उत्तम कादंबरीकाराच्या यशाचें रहस्य सांठविलें आहे. कादंबरी म्हणजे बोधामृत देणारे व्याख्यान नव्हे हें खरें. कादंबरी देवळांतील व्यास-पीठावर न बसतां रंगमहालांतील मंचकावर आरूढ झालेली असतें हें देखील तितकेंच खरें. परंतु नटव्या बाजारबसवीला देखील आत्मा असतो, मग शृंगार व सौंदर्यसंपन्न पतिव्रतेला आत्मा असला तर त्यांत नवल कोणतें ! कोणत्याहि इमारतीचा मोठेपणा आंतील प्रतीकावर अवलंबून असतो; मग तो देव-ळांतील देव असो, किंवा ताजमहालांतील प्रेमाची कबर असो किंवा मठांतील संत असो. त्या प्रती-काला शोभणारेंच शिल्प, बाह्य दृष्टीनें पाहणाऱ्याला तेथें झळकतांना व विलसतांना दिसतें.

कोणताही पाश्चात्य कादंबरीकार आदर्श म्हणून माझ्यापुढें नाहीं. माझें वाचन अतिशय असल्यामुळें कोणताच पाश्चात्य लेखक आदर्श म्हणून मजपुढें

फार दिवस टिकला नाहीं. स्कॉट, जेन ऑस्टीन, जार्ज एलीयट, हार्डी व वेल्स हे इंग्रजी कादंबरीकार मला विशेष आवडतात. डयुमा, विक्टर ह्यूगो व रोमा रोलां यांचे ग्रंथ मी अनेक वेळां वाचले आहेत व त्यांचा माझ्या मनावर विशेष परिणाम झाला आहे. रशियन ग्रंथकारापैकीं टॉलस्टाय सोडून मला फारसा कोणी आवडला नाहीं. इतर भाषांतील नामांकित ग्रंथकारांचें ग्रंथ–अर्थातच त्यांच्या इंग्रजी भाषांतर-द्वारां—मी वाचले आहेत. परंतु आजच्या हिंदु-स्थानांत वावरणाऱ्या माणसाला त्यांच्या वाचनानें तात्पुरता आनंद प्राप्त झाला तरी त्यांपासून स्फूर्ति लाभूं शकत नाहीं. युरोपांतील व हिंदुस्थानांतील परिस्थितींत व आचारविचारांत जे जमीन–अस्मानाचें अंतर आहे त्यामुळें हा आवडीनिवडीचा विरोध किंवा निदान संन्यस्त वृत्ति निर्माण होते. सर्वतोमुखीं प्रशंस-लेल्या यामा कादंबरीच्या वाचनानें तर माझ्या मनांत घृणा उत्पन्न झाली. महाराष्ट्रानें विनाकारण अवास्तव

निंदलेली हडपांची बहकलेली तरुणी यामापेक्षां शतपट सुंदर, कलाप्रधान व सात्विक ठरेल! परंतु हडपांना शिव्यांची लाखोली वाहणारे सोंवळे टीकाकार यामा कादंबरीची मुक्त कंठानें प्रशंसा करतांना पाहून मनाला सखेद आश्चर्य वाटतें. श्री. हडपांची लेखणी रशियन नसून अस्सल महाराष्ट्रीय आहे,हेंच बहुधा या चमत्काराच्या मुळाशीं असेल. पाश्चात्यांचीं मतें आपण अंधपणें कशी स्वीकारतो याचें हें नमुनेदार उदाहरण आहे. हल्लीं आपणाला गीतेपेक्षां बायबलाचा आधार भरभक्कम भासतो, हेंच खरें!

रामचंद्राच्या पराक्रमामुळें रामायणाला, कृष्णाच्या थोरवीमुळें महाभारताला, पैगंबरामुळें कुराणाला व येशू ख्रिस्तामुळें बायबलला जगांत महत्व आलें. व्यास–वाल्मिकींचा व त्यांच्या ग्रंथाचा मोठेपणा सर्वस्वी श्रीरामकृष्णांच्या मोठेपणावर अवलंबून आहे. शिवाजी महाराजांनी महाराष्ट्रांत हिंदवी स्वराज्याची स्थापना केली नसती तर श्री. हरि नारायण

आपटे किंवा नाथमाधव यांनी आपल्या उषःकाल, केवळ स्वराज्यासाठीं, सावळ्या तांडेल वगैरे उत्तम कादंबऱ्या कुठून व कशा रंगविल्या असत्या? महाराष्ट्र स्वतंत्र व सामर्थ्यवान झाल्याशिवाय महाराष्ट्रांना विचारसंपन्न, स्फूर्तिदायक व आकर्षक कदापि वाटणार नाहीं. कारण राष्ट्र मोठें झाल्यावांचून त्याचें वाङ्मय महनीय पदास चढूंच शकत नाहीं. पूर्वीं जपानी वाङ्मयाकडे पाश्चात्य जग तुच्छतेनें पहात होतें. परंतु प्रचंड रशियन साम्राज्याला जपाननें रणभूमींत लोळवल्यानंतर जपानच्या वाङ्मयाकडे युरोपचें लक्ष प्रथम वेधलें. जपान आजच्या जगांतील पहिल्या पांच प्रबल राष्ट्रांत मोडत असल्यामुळें जपानी ग्रंथांचीं युरोपीयन भाषांत हल्लीं बरींच भाषांतरें होतात व लोक तीं आवडीनें वाचतात. राष्ट्राची बुद्धिमत्ता व कर्तबगारी वाढली म्हणजे ज्ञानाच्या सर्वच शाखांत अधिकारी पुरुष त्या राष्ट्रांत निर्माण होतात व त्यांची छाप जगावर पडते. टिळक-गोखल्यांच्या काळांत

झालेले हरिभाऊ आपटे किंवा नाथमाधव यांच बोलबाला पाश्चात्य जगांत झाला नसला, तरी टिळक–गोखल्यांप्रमाणें या कादंबरीकारांची नांवें महाराष्ट्राबाहेर हिंदुस्थानांत थोड्या फार प्रमाणांत गाजलीं. आज मराठी वाङ्मयाला हिंदुस्थानांतच कोणीं विचारत-नाहीं तर परखंडांत त्याला मान मिळण्याची गोष्ट दूरच राहिली. महात्मा गांधींच्या थोरवीमुळें व पराक्रमानें आज गुजराथी वाङ्मयाला मोल चढलें आहे व त्यांची थोरवी हिंदी भाषेलाहि राष्ट्भाषा म्हणून पोषक झाली आहे. आज तरी मराठी ग्रंथांचीं इंग्रजींत भाषांतरें करण्याचा हव्यास, काळाचा, शक्तीचा व द्रव्याचा निःपात करणारा आहे आणि कोणीहि शहाण्यानें त्या नादीं लागूं नये असें आमचें निक्षून सांगणें आहे. आजच्या मराठी कादंबऱ्यांना हिंदुस्थानांतील इतर प्रांतांत देखील फारसा मान मिळणार नाहीं, मग युरोपांत यांना कोण हुंगून विचारणार ? महाराष्ट्रांतील आजचे कर्ते थोर पुरुष म्हणजे तात्या-

साहेब केळकर, बापूजी अणे किंवा डॉक्टर मुंजे हे होत. त्यांच्या थोरवीला शोभेल असेंच कादंबरीकथा-लेखन आज महाराष्ट्रांत होत आहे. तेव्हां आजच्या तरुणांनीं प्रथम महाराष्ट्र, स्वतंत्र, संपन्न व सामर्थ्यं-वान करण्याकडे आपल्या सर्व शक्तीचा उपयोग करावा. महाराष्ट्र आपल्या नांवाप्रमाणें मोठें राष्ट्र म्हणून जगांत मान्यता पावेल तेव्हांच या देशांत थोर तत्त्वज्ञानी, कवि, कादंबरीकार आणि शास्त्रज्ञ निर्माण होतील व त्यांच्या प्रभावशाली विचारांची ओळख करून घेण्यासाठीं युरोपांतील पंडित अहमहमिकेनें मराठी भाषा शिकतील व मराठी ग्रंथांचीं भाषांतरें करून त्यांचा आस्वाद आपल्या देशबंधूंना चाखवतील. आपणाला तो खटाटोप मुळींच करावा लागणार नाहीं. आपलें आजचें वाङ्मय तेजस्वी असतें तर आपलें राष्ट्र आज असें मागसलेले राहिलेंच नसतें. शिवकालीन महाराष्ट्र तेजस्वी होता म्हणून तत्कालीन मराठी वाङ्मयहि तेजस्वी व विचार-

प्रवर्तक झालें. तुकारामाच्या अभंगांची युरोपीयन भाषांत भाषांतरें झालींच कीं नाहींत?

श्री. हरिभाऊ आपटे, नाथमाधव, श्री. नारायण हरि आपटे या मराठी कादंबरीकारांच्या कादंबऱ्या मला विशेष आवडतात. श्री. वि. सी. गुर्जर हे देखील माझे आवडते मराठी कादंबरीकार आहेत. पण त्याचें श्रेय त्यांच्या रसाळ व चटकदार लेखणी-पेक्षां बंगाली कादंबरीकारांच्या रचनाचातुर्याकडे जातें. कारण त्यांच्या बहुतेक कादंबऱ्या बंगालींतून मराठींत भाषांतरित झालेल्या आहेत. हिंदुस्थानांत बंगाल अत्यंत पुढारलेला व सुधारलेला प्रांत आहे. पाश्चात्य देशांत विद्याविभूषित झालेले, त्रिखंड प्रवास करून आलेले व जगांतील विविध अनुभव घेतलेले, व्यासंगी व व्यापक दृष्टींचे देशभक्त तिकडे कादंबरी—लेखन करीत असतात. त्यामुळें अखिल हिंदी वाङ्मयांत आधुनिक बंगाली वाङ्मयाचा दर्जा फार मोठा आहे व म्हणूनच उत्तम हिंदी वाङ्मयाचा नमुना म्हणून

आजकाल बंगाली ग्रंथांचीं इंग्रजींत रूपांतरें होतात. एखाद्या ग्रंथाचें भाषांतर कोणी जबरीनें व अट्टाहासानें इंग्रजींत केलें म्हणून तो ग्रंथ जगमान्यता पावणार नाहीं. तो जितक्या प्रमाणांत उत्तम असेल तेवढ्या प्रमाणांत लोक त्याची विचारपूस करतील. उलटपक्षीं, उत्तम ग्रंथ कोणत्याहि भाषेंत निर्माण झाले तरी त्यांचा सुगंध व यशोदुंदुभी दशदिशांस पसरतो आणि त्यांची परभाषांत भाषांतरें होऊं लागतात. बंगाली लेखकांच्या मानानें बहुतेक मराठी कथा–लेखक फारसे न शिकलेले, खुरट्या विचाराचे, महाराष्ट्राच्या चतुःसीमाबाहेर फारसा प्रवास न केलेले (मग परखंडाशीं परिचय असण्याची गोष्ट दूरच राहिली), शाब्दिक जंजाळांत गुरफटलेले, प्रत्यक्ष परिस्थितीची ओळख नसणारे, संकटाला भिणारे, देशाच्या शत्रूंशी झुंझ घेण्यास कचरणारे व स्वातंत्र्य–पराङ्मुख विचारांचे आणि त्या नेभळटपणाचा अभिमान वाहणारे आहेत. त्यांच्या ग्रंथांचीं हट्टानें त्यांच्या कोणी स्नेह्यानें इंग्रजींत भाषांतरें केलीं तरी

त्यांना मान्यता कशी मिळणार ? कांहीं अलौकिक प्रतिभासंपन्न बंगाली कादंबरीकारांच्या गळ्यांत इंग्रजीची सरी शोभतांना पाहून आमचे स्वतःला दीडशहाणे समजणारे मराठी ग्रंथकार इंग्रजी भाषेची दोरी गळ्यांत अडकवण्याचा हव्यास धरीत आहेत. पण त्यांना तो अलंकार शोभादायक न होतां त्यांच्या गळ्याला तो दोरीचा फास मात्र घट्ट बसेल, हें निश्चित ! आजकाल युरोपांत लघु कादंबऱ्यांची प्रथा मागें पडली असून ह्यूग वालपोल, रोमां रोला वगैरे लेखक दोन दोन तीन तीन पिढ्यांच्या कुळकथा रंगविणाऱ्या सुदीर्घ कादंबऱ्या लिहूं लागले आहेत व त्या अत्यंत लोकप्रियहि झाल्या आहेत. त्या दृष्टीनें अलीकडच्या कादंबऱ्यांत श्री. दत्तो अप्पाजी तुळजापूरकर यांनीं लिहिलेली **माझें रामायण** ही सुदीर्घ कथा अत्यंत सुरस व चटकदार उतरलेली आहे. ती वाचतांना रोमांन रोलांच्या जीन ख्रीस्तोफर किंवा एनचांटेड सोल या कादंबऱ्यांची आठवण होते. माझें रामायण या कादंबरीच्या तुलनेला श्री. खांडेकर

किंवा फडके यांची एकहि कादंबरी बसूं शकणार नाहीं व अलीकडच्या मराठी कादंबऱ्यांत तिच्याइतका खप दुसऱ्या कोणत्याहि कादंबरीचा झाला नाहीं. श्री. खांडेकर व फडके हे आजच्या तरुण पिढीचे आवडते कादंबरीकार आहेत. श्री. फडक्यांच्या लेखनांत श्री. खांडेकरांच्या लेखनांतील उपमांची व कोट्यांची खैरात उधळलेली दिसणार नाहीं. त्यामुळें खांडेकरांची भाषा जितकी बोजड, अलंकारिक व कृत्रिम भासते तितकीच फडक्यांची भाषा सरळ, रसाळ व मनोहर भासते. कथानकसौंदर्य व कलाविकास या दोन्ही दृष्टींनीं फडक्यांची वाचकांवर अधिक लवकर छाप पडते व त्यांच्या कादंबऱ्या वाचकांचें मन मोहून टाकतात. मात्र फडक्यांची ललित सृष्टि उच्च मध्यम वर्गाच्या चैनी, सुखवस्तु व शिक्षित परंतु संपन्न स्त्रियांच्या कामुक व लैंगिक वासनाभोंवती सदैव घुटमळत असते. उलटपक्षीं श्री. खांडेकरांचें अलिकडचें ललित लिखाण ध्येयप्रधान, तात्त्विक व समाजांतील खालच्या थराशीं सहानुभूति

ठेवून उत्पन्न झालेलें आहे. अलीकडच्या मराठी कथांत श्री. फडके यांची निरंजन, श्री. वरेरकर यांची धांवता धोटा व श्री. खांडेकर यांची दोन ध्रुव या कादंबऱ्या मला विशेष आवडल्या. परंतु माझें रामायण, निरंजन, धांवता धोटा किंवा दोन ध्रुव यांपैकीं कोणत्याही कादंबरीचें इंग्रजींत भाषांतर झालें तरी मराठी वाङ्मयाला आज आंतरराष्ट्रीय महत्व येईल असें मला मुळींच वाटत नाहीं. या माझ्या स्पष्टोक्तीनें श्री. तुळजापूरकर, फडके, वरेरकर किंवा खांडेकर यांना काडीमात्र विषाद न वाटला तरी नोबेल प्राईझ मिळविण्याच्या महत्वाकांक्षेनें जे मराठी लेखक स्वतःस लेखन–धुरंधर समजून आशाळभूतपणें जिभल्या चाटत आहेत त्या श्री. मोटेप्रणीत विभावरी–प्रासादिक मंडळीचा संतापातिशयानें भडका उडेल यांत शंका नाहीं. परंतु **अप्रियमपि सत्यं ब्रूयात्** हा माझा दंडक आहे. तेव्हां अशा संतापाला भीक घालून माझें कसें चालणार ?

# या ग्रंथांतील लेखकांच्या कादंबऱ्या—

## न. चिं. केळकर—

१ नवलपूरचा संस्थानिक
२ काबळा आणि ढापि
३ बलिदान
४ दिवाण झिप्री

## वा. म. जोशी—

१ नलिनी
२ रागिणी
३ आश्रमहारिणी
४ सुशिलेचा देव
५ इंदु काळे व सरला भोळे.

## वि. स. खांडेकर—

१ हृदयाची हांक
२ कांचन मृग
३ दोन ध्रुव
४ उल्का
५ हिरवा चांफा
६ दोन मनें
७ रिकामा देव्हारा
८ पांढरे ढग
९ सुखाचा शोध
१० पहिलें प्रेम
११ जळलेला मोहर
१२ क्रौंचवध

## ग. त्र्यं. माडखोलकर—

१ भंगलेलें देऊळ
२ मुक्तात्मा
३ डाक बंगला
४ कान्ता
५ मुखवटे
६ नवे संसार
७ नागकन्या
८ दुहेरी जीवन

## ना. ह. आपटे—

१ अजिंक्य तारा
२ रजपुतांचा भीष्म
३ लांछित चंद्रमा
४ संधिकाल
५ हृदयाची श्रीमंती
६ न पटणारी गोष्ट

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | वैभवाचें कोंदणात | १४ | रत्नगुंफा |
| ८ | पहाटेपूर्वीचा काळोख | १५ | ते आणि मी |
| ९ | भुरळ | १६ | विफलता |
| १० | याला कारण शिक्षण | १७ | पुरुषाचें भाग्य |
| ११ | पिशाच्च साधन | १८ | सोन्याचे बिलवर |
| १२ | भाग्यश्री | १९ | उमज पडेल तर |
| १३ | दिवाकर—दृष्टी | २० | अपेक्षा |

## डॉ. श्री. व्यं. केतकर—

| | | | |
|---|---|---|---|
| १ | आशावादी | ५ | बिचक्षणा |
| २ | गोंडवनांतील प्रियवंदा | ६ | भटक्या |
| ३ | ब्राम्हणकन्या | ७ | परांगदा |
| ४ | गांवसासू | | |

## भा. वि. वरेरकर—

| | | | |
|---|---|---|---|
| १ | चिमणी | ९ | उमलती कळी |
| २ | गोदू गोखले ( पूर्वार्ध ) | १० | भानगड गल्ली |
| ३ | धांवता धोटा | ११ | पेटतें पाणी |
| ४ | परतभेट | १२ | न पूजलेली देवता |
| ५ | कुलदैवत | १३ | तरते पोलाद |
| ६ | उघड झांप | १४ | गीता |
| ७ | विकारी वात्सल्य | १५ | सात लाखांतील एक |
| ८ | वेणू वेलणकर | | |

## ना. के. बेहरे—

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अहिल्योद्धार | ४ | युद्ध-संसार |
| २ | सीतावनवास | ५ | ध्येयाकडे |
| ३ | जीवनरहस्य | ६ | हिंदु कोण ? |